निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०२/२०१७/01757 दिनांक- ३१.०३.२०१७

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. रावसाहेब अहिरे<br>आसरा कॉ-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड<br>३, आसरा बिल्डिंग, बाहनणवाडी,<br>कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०. |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | १०.०२.२०१७ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | १३.०२.२०१७ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | ०३.०३.२०१७ |

**मागितलेली माहिती:-**

१. श्रावणी ब्युटी पार्लर प्रो.शरद राजाराम जगतापचे बेकायदेशीरपणे दिलेले कमार्शियल मीटर काढून टाकण्या संबंधी रिलायन्सला वेळोवेळी पत्रे लिहून ही ते कृती तर करत नाहीच पण शरद जगतापच्या वडील व चुलत्याच्याही बेकायदेशीर मीटर काढत नाहीत. यामुळे प्राण, मालमत्ता हानी होऊ शकते. शरद जगतापने धंदा नसतांना खोटे सांगून व खोटी कागदपत्रे देऊन गुमास्ता लायसन मिळविले होते. ते बी.एम.सी. ने रद केले तरी रिलायन्सने अजूनही मीटर काढले नाही. तसे आमच्या २७-१०-२०१६ च्या पत्रात आपणास व रिलायन्सला कळविले होते. अजून काही ही आपण व रिलायन्सने कृती केली नाही या संबंधी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला आपला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. १०.०२.२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे पुरविण्यात येत आहे.-

| अ.क्र. | आवश्यक माहितीचा तपशील | माहितीचा खुलासा |
|---|---|---|
| १. | श्रावणी ब्युटीपार्लर प्रो.शरद राजाराम जगतापचे बेकायदेशीर पणे दिलेले कमार्शियल मीटर काढून टाकण्यासंबंधी | आपण विचारलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही. आपणांस जर काही माहिती हवी असल्यास आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ३ नुसार माहिती मागावी. |

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

अपिलार्थी यानी माहीती अधिकार अर्जातील माहिती शरद राजाराम जगतापचे गुमास्ता लायसन रद झाले असून त्याने खोटी कागदपत्रे देऊन घेतलेले कमार्शियल मीटर काढून टाकणे बाबद.

आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत) :-

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. २०.०३.२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले.

अपीलार्थी यांनी त्यांचे अर्जात व अपीलात कोणतेही दस्तऐवज अथवा माहिती मागीतली नसून, तक्रार स्वरुपात श्रावणी ब्युटी पार्लरचे मीटर काढण्यासाठी अर्ज केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. करिता, अपिलार्थीनी सुनावणी दरम्यान अपील माघारी घेत असल्याचे व त्यांना यापूढे कुठलेली तक्रार नसल्याचे लेखी दिलेली असल्याने माहिती आधिकारी यांनी पारीत केलेल्या निर्णयात हस्तक्षेप करण्याची गरज नसल्याचे दिसून येते. करिता सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

निर्णय

अपील निकाली काढण्यात येत आहे.

29.3.16

(अनिलकुमार उके)

उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ.